**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १३५ व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन /राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी स्थानिक खासदारांना पत्र लिहिण्याचं प्रधानमंत्र्यांचं महिलांना आवाहन

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या नागपूर दौऱ्यावर

- अतिरिक्त वजन वाहून नेणाऱ्या वाहनांवर उद्यापासून राष्ट्रीय महामार्गावर वाढीव शुल्क

**आणि**

- मराठी भाषा येत नसलेल्या रिक्षा-टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करण्याचा परिवहन मंत्र्यांचा इशारा

<><><><><>

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 135 वी जयंती देशभरात साजरी होत आहे. त्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुजरातमधल्या गांधीनगरमध्ये लोकभवन इथं असलेल्या बाबासाहेबांच्या छायाचित्राला पुष्पांजली अर्पण केली. उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे, केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी संसद परिसरातल्या प्रेरणास्थळ इथं बाबासाहेबांच्या पुतळ्याला आदरांजली वाहिली.

मुंबईसह राज्यातही आंबेडकर जयंतीचा उत्साह दिसत आहे. बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी मुंबईसह राज्याच्या विविध भागातून अनुयायी सकाळपासूनच चैत्यभूमीवर दाखल होत आहेत. चैत्यभूमीवर आज शासकीय

मानवंदना देण्यात आली. राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह इतर मान्यवरांनी बाबासाहेबांना अभिवादन केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी, बाबासाहेबांच्या योगदानाची आठवण करुन दिली.

**- - होल्ड - मुख्यमंत्री बाइट - --**

**<><><><><>**

राज्यभरातही मोठ्या उत्साहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन झालं. याचा सविस्तर वृत्तांत ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - - -(१ मिनिटं २ सेकंद)**

*(भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं मूळ गाव असलेल्या **रत्नागिरी** जिल्ह्यातल्या आंबडवे इथं सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्यावतीने आज जयंती साजरी करण्यात आली. पालकमंत्री डॉ. उदय सामंत, राज्यमंत्री योगेश कदम यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्याला आणि अस्थिकलशालाही पुष्पहार अर्पण केला. आंबडवे आंतरराष्ट्रीय दर्जाचं स्मारक उभारण्याचं आश्वासन उदय सामंत यांनी दिली. रत्नागिरी पोलीस दलाच्या बँड पथकानं सलामी देवून राज्यगीताची धून वाजवली.*

***नाशिक**मध्ये आज सामाजिक समता सप्ताहाची आज सांगता झाली. नाशिक सायकलिस्ट फाउंडेशनने शालिमार इथल्या आंबेडकर स्मारकापासून सुरुवात करून पाथर्डी फाटा इथल्या आंबेडकर स्मारकापर्यंत सायकलयात्रा काढली.*

***बुलढाण्यात** जिल्हा परिषद शाळांमध्ये वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा झाल्या. यावेळी विद्यार्थ्यांना संविधान पुस्तिकेचं वाटप करण्यात आलं.*

***यवतमाळ**मध्ये जयंतीनिमित्त भीमगीतावर फ्लॅश मॉब झाला तसंच ढोल आणि लेझीम पथकाचं सादरीकरण झालं.*

*याशिवाय इतरही जिल्ह्यांमध्ये विविध उपक्रमांनी बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी झाली.)*

<><><><><>

महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह म्हणजे बाबासाहेबांच्या जीवनकार्यातला एक मैलाचा दगड. याविषयी ज्येष्ठ विचारवंत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी आकाशवाणीला विशेष मुलाखत दिली आहे. त्यात ते म्हणाले

**- - होल्ड... बाईट - -**

ही पूर्ण मुलाखत आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून आज संध्याकाळी सव्वासात वाजता ऐकता येईल.

<><><><><>

देशातल्या सर्व महिलांनी स्थानिक खासदारांना पत्र लिहून नारीशक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांना पाठिंबा देण्यासाठी प्रोत्साहित करावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पत्राद्वारे केलं आहे. देशातल्या महिला वर्गाला उद्देशून एक पत्र त्यांनी समाजमाध्यमांवर प्रसारित केलं आहे. १६ एप्रिलपासून संसदेत यावर चर्चा सुरू होणार आहे. २०२९ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपासून देशात महिलांसाठी आरक्षण लागू करायचं असेल तर या सुधारणा मंजूर होण्याची गरज आहे. या निर्णयाचा परिणाम कित्येक शतकांपर्यंत देशावर होईल असं त्यांनी या पत्रात नमूद केलं आहे. या सुधारणा मंजूर झाल्यावर देशात लोकसभेच्या साडे आठशे जागा होतील.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या नागपूर दौऱ्यावर आहेत. नागपूरच्या एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या दुसऱ्या दीक्षान्त समारंभासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून त्यात उपस्थित राहतील. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी इथं भारतीय

महसूल सेवेच्या ७८ व्या तुकडीच्या प्रशिक्षण समापन समारंभ त्यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल.

<><><><><>

अतिरिक्त वजन वाहून नेणाऱ्या वाहनांवर उद्यापासून राष्ट्रीय महामार्गावर वजनानुसार शुल्क आकारलं जाणार आहे. दहा टक्क्यापेक्षा जास्त आणि ४० टक्क्यापर्यंत अतिरिक्त वजन असलेल्या वाहनांना दुप्पट शुल्क आकारलं जाईल. तर ४० टक्क्यापेक्षा जास्त वजन असलेल्या वाहनांवर चौपट शुल्क आकारलं जाणार आहे. हे शुल्क फास्टॅगद्वारे वसूल केलं जाईल, असं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने  सांगितलं आहे.

<><><><><>

रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा अवगत नसल्यास त्यांचे परवाने रद्द केले जातील असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. परवानाधारक रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना मराठी लिहीता आणि वाचता येतं का याची पडताळणी  मोटार परिवहन विभागामार्फत येत्या १ मे पासून करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्रात रिक्षा- टॅक्सी चालकांना मराठी भाषेचं ज्ञान आवश्यक करणारा नियम आधीपासूनच लागू आहे, त्याचं पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द केले जातील तसंच नियम डावलून परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कारवाई करु असं सरनाईक यांनी सांगितलं.

<><><><><>

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या संदर्भातला न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल राज्य सरकारनं जाहीर करावा अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. या समितीनं कशाप्रकारे विभाजन केलं आहे हे तपासू द्यावं, अशी विनंती त्यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली.

<><><><><>

मुंबईत गोरेगाव इथं नेस्को सेंटरमधे संगीताच्या कार्यक्रमावेळी अमली पदार्थाचं अतिसेवन केल्यामुळे २ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी पोलिसांनी काल ६ जणांना अटक केली. यात कार्यक्रमाचे आयोजक आणि अमली पदार्थांचा संशयित पुरवठादार यांचा समावेश आहे. या सर्वांना येत्या गुरुवारपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. या कार्यक्रमाच्या वेळी अनेकांनी अमली पदार्थाचं सेवन केल्यानंतर त्रास झाला आणि रुग्णालयात दाखल करावं लागलं होतं. त्यातल्या दोघांचा काल मृत्यू झाला असं पोलिसांनी सांगितलं.

<><><><>

बिहारचे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे नेते सम्राट चौधरी यांचा शपथविधी उद्या होण्याची शक्यता आहे. नितीश कुमार यांच्या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत होते.

<><><><>

नाशिकजवळच्या त्र्यंबकेश्वर देवस्थानात व्हीआयपी दर्शनाच्या नावाखाली भाविकांची आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी विश्वस्त पुरुषोत्तम कडलग याला अटक केली आहे.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्जचा मुकाबला कोलकाता नाईट रायडर्सबरोबर चेन्नईमधे  होणार आहे. थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरु होईल. कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

मुंबईसह संपूर्ण कोकणात तसंच सोलापूर, सांगलीमध्ये  आगामी दोन दिवसात उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भ आणि

मराठवाड्याच्या काही भागातही परवा उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. इतरत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता आहे.

अकोल्यात आज राज्यातल्या सर्वाधिक ४३ पूर्णांक ८ अंश सेल्सियस तपमानाची नोंद झाली.

//<><><><><>//